नि.फौ.ख.क्रं.१७९/२०२३
सरकार वि. अतुल
**नि.क्रं. १२**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की–

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | दुर्गा अश्वीन जिभकाटे, |
| वय सुमारे | : | ३१ वर्ष, व्यवसाय– आयसीआरबी, पंचायत समिती पवनी, |
| निवासस्थान | : | पिंपळगाव, |
| तालुका | : | पवनी, जिल्हा: भंडारा. |

**सरतपास – सहा. सरकारी वकील श्रीमती पी.बी.नवनाघे मॅडम यांचेमार्फत–**

१) आरोपी अतुल याला ओळखते. तो न्यायालयात हजर आहे. घटना दिनांक २१/०६/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता माझ्या घरी घडली. त्यादिवशी मी माझ्या घरी काम करीत होती. घरातून कचरा बाहेर फेकत होती. आरोपी रस्त्याने जात होते. त्यानंतर मी त्यांना म्हटले की, मदतनीश जी जागा निघत होती त्याबद्दल त्यांना बोलायचे होते. त्यानंतर त्यांनी म्हटले की घरात बसुन बोलु असे म्हटले. त्यानंतर आरोपी हा घरात आला व बेडवर बसला. त्यानंतर तेथून उठून माझ्या गालाला हात लावून आय लव यु असे म्हटले. त्यानंतर मी घाबरली आणि बाहेर निघाली. त्यानंतर माझ्या पाठीमागे आला आणि माझ्या छातीला हात लावला व बाहेर निघुन गेला. मी घाबरली होती. त्यानंतर मी माझ्या पतीला फोन लावण्याचा प्रयत्न केला पण फोन लागत नव्हता.

२) त्यानंतर २२/०६/२०२३ रोजी विवाह नोंदणीचा कागदपत्रे तयार करण्याकरिता मी धडपडत होती. मी त्याकरिता माहेरी गेली. त्यानंतर मी माझ्या पतीला विचारविनिमय करुन तक्रार देण्याचे ठरविले.

३) त्यानंतर २३/०६/२०२६ रोजी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्रं. १३** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्रं. १४** देण्यात येते.

४) ज्यादिवशी घटना झाली त्यादिवशी मी मिटींगला गेली होती.

**आरोपीतर्फे त्यांचे वकील श्री. एम. एम. गोस्वामी यांनी उलटतपास घेण्याकरिता तयारी झाली नाही म्हणून अर्ज (नि.क्र. १५) दिला. त्या अर्जावरील आदेशानुसार उलटतपास पुढील तारखे पर्यंत तहकुब.**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
| स्वा/– | स्वा/– |
| (अ. वि. पंडित) | (अ. वि. पंडित) |
| न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी. | न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी. |
| १३/०७/२०२६ | १३/०७/२०२६ |

नि.फौ.ख.क्रं.१७९/२०२३
सरकार वि. अतुल
**नि.क्रं. १२ पुढे**

**<u>शपथेवर उलट तपास आरोपीतर्फे वकील श्री. एम. एम. गोस्वामी साहेब यांच्यामार्फत:-</u>**

५) मी माझे काम गावामध्ये करते. माझे काम रोजंदारीचे नाही. मला महिन्याचे ३ हजार रुपये मिळतात. माझे काम हे कंत्राटी तत्वावर आहे. हे म्हणणे खरे आहे की अंगनवाडी मध्ये मदतनीशच्या जागा सन २०२३ मध्ये निघाल्या होत्या. आरोपी हे ग्रामपंचायत मध्ये उपसरपंच आहेत.

६) हे म्हणणे खरे आहे की मला मदतनीशच्या जागेकरीता अर्ज भरावयाचा होता. हे म्हणणे खरे आहे की मला आरोपीच्या मदतीने फॉर्म भरायचा होता. हे म्हणणे खरे नाही की मी स्वत: आरोपीला त्याकरिता फोन केला. हे म्हणणे खरे आहे की मी आरोपीला तो फॉर्म भरण्याकरिता स्वत: माझया घरी बोलाविले होते.

७) हे म्हणणे खरे नाही की जेव्हा मी आरोपीला घरी बोलाविले तेव्हा माझे पती घरी हजर होते. हे म्हणणे खरे आहे की माझ्या गावाच्या बाजुला खांबाडी गाव आहे. हे म्हणणे खरे नाही की त्या गावाच्या ब्राम्हणकर बाईला मी ओळखते व ती माझ्या घरी येत असते. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला जेव्हा मी माझया घरी बोलाविले तेव्हा ब्राम्हणकर नावाची बाई आली होती.

८) हे म्हणणे खरे नाही की आरोपीने मला त्याची लेखी परिक्षा बाल कल्याण विभागामार्फत होईल असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला म्हटले की तुम्ही गावाचे उपसरपंच आहेत जागा भरण्याचे काम तुमच्याकडे आहे माझे काम करुन दया. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने म्हटले की लेखी परिक्षा दिल्या शिवाय निवड होत ते माझया हाती नाही त्यामुळे मी नाराज झाले. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर आरोपी हा त्याच्या घरी निघून गेला.

९) हे म्हणणे खरे नाही की मी सरतपासामध्ये जी घटना सांगितली तशी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे आहे की मी तक्रारीमध्ये व बयानामध्ये आरोपीला मी घरी बोलाविले हा मजकूर बरोबर आहे. मी पोलिसांना बयान देतेवेळी असे सांगितले नव्हते की,'त्यानंतर त्यांनी म्हटले की, घरात बसून बोलू'. हे म्हणणे खरे नाही की आरोपी बेडवरुन उठला आणि त्याने माझ्या गालाला हात लावुन आय लव यु म्हटले असे कोणतेही कृत्य आरोपीने केले नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला फसविण्याकरिता मी त्यांच्यावर खोटा आरोप केला.

१०) घटनेच्या दिवशी माझे पती गावामध्ये हजर नव्हते.

**(न्यायालयाने विचारलेला प्रश्न)**

प्रश्न:- घटनेचे दिवशी तुमचे पती कुठे होते?

उत्तर- पवनीला जमिनीचे कागदपत्राकरिता आले होते.

प्रश्न:- असे काही झाले होते का त्यादिवशी म्हणजे दिनांक २१/०६/२०२३ रोजी ११.४५ मिनीटांनी तुमचे पती सुनील बिलवणे यांच्या हॉटेल वर चहा पिण्याकरिता गेले होते?

उत्तर- सकाळी गेले होते. मला टाईमींग माहीत नाही.

प्रश्न:- तुमचे पती किती वाजता पवनीला गेले होते?

उत्तर- ११ ते ११.३० वाजता माझे पती पवनीला गेले होते.

११) हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या दिवशी माझे पती पवनीला गेले नव्हते घरीच होते. हे म्हणणे खरे नाही की अशी कोणतीही घटना घडली नाही व मी घाबरुन बाहेर निघाली हे खोटे सांगत

आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर आरोपी हा माझ्या पाठीमागून आला व त्याने माझ्या छातीला हात लावला व बाहेर निघुन गेला हे मी खोटे सांगत आहे. मी पोलीसांना बयान देतेवेळी सांगितले होते की, 'आरोपी माझ्या पाठीमागे आला आणि त्यानंतर माझ्या छातीला हात लावला'. हे पोलिसांना बयान देतेवेळी सांगितले होते परंतु पोलिसांनी माझ्या बयानात तसे का लिहिले नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. पोलिसांना मी बयान देतेवेळी सांगितले होते की माझे पती गावात चाय पिण्याकरिता गेले होते. मी पोलिसांना बयान देतेवेळी असे सांगितले होते की मी आरोपीला बेड वर बसण्यास सांगितले. हे म्हणणे खरे आहे की मी सांगितल्यानंतर अतुल बेडवर बसला.

१२) हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या पतीला फोन लावण्याचा प्रयत्न केला परंतु फोन लागला नाही हे मी खोटे सांगितले आहे. माझे पती सायंकाळी ६.०० वाजता घरी आले. मी त्याच दिवशी घटना माझ्या पतीला सांगितली. माझ्या घराला लागून जिभकाटे व देशमुख यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या घराजवळून सतत गाडी घोडे जात असतात. हे म्हणणे खरे आहे की माझे गावातील पोलीस पाटील व सरपंच यांच्याशी चांगले संबंध आहेत. तथाकथीत घटनेच्या वेळी मी ओरडली नाही. मी घटनेबद्दल कोणालाही सांगितले नाही. मी पोलीस पाटील अथवा सरपंचाकडे जावुन आरोपीची तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की अशी घटना न घडल्यामुळे मी कोणलाही सांगितले नाही.

१३) मी माझया सास–याची घरी राहते. माझी सासू जिवंत आहे. मला राहायला माझया सास–याने एक खोली दिली. एक खोली नंतर माझे सासु सासरे तिथेच राहतात. मी घटना झाल्यानंतर माझ्या सासु सास–यांना लगेच जावुन सांगितले नाही. मी सासु सास–यांना दोन तीन दिवसानंतर ही ती घटना सांगितली नाही. गावामध्ये दोन राजकीय पक्ष आहेत का ते मला माहीत नाही. अमीत गाडेकर हे ग्रामपंचायतचे सदस्य आहेत. आरोपी हा विरुध्द पक्षाचा सदस्य आहे का हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी विरुध्द पक्षाच्या सांगण्यावरुन व रागाच्या भरात आरोपीविरुध्द खोटी तक्रार दाखल केली.

१४) हे म्हणणे खरे नाही की मी २२ तारखेला कुर्झा येथे नव्हती. मला माझे दस्त २६.०६.२०२३ रोजी मिळाले का हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी २६.०६.२०२३ रोजी विवाहाचे प्रमाणपत्र घेण्याकरिता कुर्झा येथे गेली होती. २१.०६.२०२३ रोजी तारखेला माझे पवनी येथे पंचायत समितीमध्ये मिटींग होती तेथे गेली होती. ती मिटींग महिला महिलांची अधिकारी यांच्यासोबत होती. माझी मिटींग सकाळी १० ते ६ वाजेपर्यंत चालली. मी घटनेबद्दल कोणालाच सांगितली नाही. मी बीडीओ किंवा गटविकास अधिकारी यांना सांगितली नाही. मी २१.०६.२०२३ रोजी संध्याकाळी ६.०० वाजता घरी परत आले. माझ्या पतीकडे मोटारसायकल आहे. मी माझया पतीला २१ तारखेला रिपोर्ट देण्याकरिता म्हटले होते. परंतु आम्ही २१ तारखेला फिर्याद दिली नाही. मी २२ तारखेला माझ्या पती सोबत नव्हती. मी २२ तारखेला पोलीस पाटलाच्या मदतीने पोलीस स्टेशनला जावुन तक्रार देण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की अशी कोणतीही घटना न घडल्यामुळे मी २१ तारखेला फिर्याद दिली नाही व २२ तारखेला ही फिर्याद दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की मी २३ तारखेला सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत पोलीस स्टेशनला फिर्याद देण्याकरिता गेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की २३ तारखेला मी बचत गटाच्या महिलांसोबत होती. मी घटनेची माहिती बचत गटाच्या अध्यक्षाला सांगितली होती. मी अध्यक्षाला घटने बद्दल ११ वाजता सांगितले. ११ वाजता मी पोलिस स्टेशनला फिर्याद देण्याकरिता गेली नाही. हे म्हणणे खरे आहे की माझया पती

सोबत विचारविनिमय करुन रात्री ११ वाजता अडयाळ पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने मदतनीश पदाकरिता मदत न केल्यामुळे नव–या सोबत संगणमत करुन आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

१५) हे म्हणणे खरे आहे की गोपाल खापरीकर नावाचा इसम माझ्या घरी सतत येतो. हे म्हणणे खरे नाही की मी मार्च, एप्रिल २०२३ मध्ये माझया पती सोबत भांडण करुन २० दिवस घराच्या बाहेर होती. हे म्हणणे खरे नाही की मी माझया पतीविरुध्द पोलीस स्टेशनला यापुर्वी फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला फसविण्याकरिता हेतुपुरस्सर तीन दिवसानंतर खोटी फिर्याद दिली व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास–काही नाही.**

समक्ष
स्वा/–

(अ. वि. पंडित)
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी.
२१/०७/२०२६

श्रवणोत्तर स्विकृत
स्वा/–

(अ. वि. पंडित)
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी.
२१/०७/२०२६